# मीरेची थकली रे ! पैंजणे

मीरेची थकली रे ! पैंजणे
कृष्णा होईल केव्हा येणे ॥धृ॥

देहशिरेच्या तारा थकल्या
बेसूर सूर जहाले ।
हातामधल्या चिपळ्या थिजल्या
लयहीन ताल जहाले ॥
भैरवी छाया मंद, मंद हो माझे हे गाणे ॥१॥

तुझ्या प्रीतीचा भूप नटविला
सोडून सारे काही ।
तुझ्या गर्जनेच्या तालावर
माझी सरिता वाही ॥
तुझ्या भेटीची लय साधेना, कशास आता जिणे ? ॥२॥

जोगन बनूनि जोगियात मी
सख्या तुला आळविले ।
ब्रम्ह स्वरांचे घेऊन संगे
कुठे, कुठे शोधिले ॥
व्याकुळ मीरा थकली आता थकली आवर्तने ॥३॥

मम रागातील सूर बनून ये
नृत्यातील झंकार ।
मम प्रीतीचा सखा बनून ये
दे प्रेमा हुंकार ॥
तुझ्याविना निर्जीव शब्दांना देऊ कशी जीवने॥४॥

– जयंतकुमार त्रिभुवन
('साहेर छाया' या काव्यसंग्रहातून)